# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/2014-15/66

दिनांक : 28.1.2014

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे

**विषय : शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना प्रथम/ द्वितीय पाळी करीता मुदतवाढीबाबत..**

संदर्भ : 1. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत निर्गमित जाहिर सूचना 2014-15

2. या कार्यालयाचे पत्र क्र. 10/एनजीपी/2012/1343, दि.11.12.2012

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेशक्षमता वाढ/ घट, नवीन अभ्यासक्रम, मुदतवाढ देणे इ.बाबत संदर्भान्वये जाहिर सूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

तरी, त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष 2013-14 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे, अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता प्रथम/ द्वितीय पाळी करीता मुदतवाढीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या जाहिर सूचनेनुसार तात्काळ कार्यवाही करावी. मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करतांना ज्या संस्थेत प्रथम पाळीमध्ये अभ्यासक्रम मंजूर नाहीत अशा संस्थांनी थेट द्वितीय पाळीसाठी प्रस्ताव सादर करु नयेत, ही बाब ध्यानात घ्यावी. कोणत्याही पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये प्रथम/ द्वितीय पाळीकरीता मुदतवाढी शिवाय शैक्षणिक वर्ष 2014-15 मध्ये प्रवेश झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची वैयक्तिक राहील, याबाबतची जाणीव संबंधीत प्राचार्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

पुढे असेही कळविण्यात येते की, संदर्भाधीन 2च्या पत्र/ पृष्ठांकन पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने (त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडत आहे.), धुळे, अकोला (मुर्तिजापूर), अमरावती, नागपूर, परभणी (जिंतूर), औरंगाबाद, बीड, बुलढाणा (खामगांव) व वाशिम या शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता द्वितीय पाळी सुरु करण्याच्या दृष्टीने, ज्या संस्थांमध्ये परिषदेमार्फत द्वितीय पाळीस मान्यता असल्यास मुदतवाढीसाठी व परिषदेमार्फत द्वितीय पाळी मंजूर करण्यात आली नसल्यास द्वितीय पाळीसाठी , प्रथम पाळीमध्ये सुरु असलेले अभ्यासक्रम प्रस्तावित करुन परीषदेची मान्यता घेण्याबाबतच्या सूचनाही आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात.

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

क्र. तंशिस/प्राकाना/आयटी/माव्यप्र/२०१४/327

दि. 30 JAN 2014

प्रति,

प्राचार्य,

सर्व तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र व

हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नोलॉजी पदवीका संस्था

नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार अभ्यासक्रमाच्या मुदतवाढीबाबतची कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर